३) <u>निर्णय प्रक्रीयेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदायित्व निश्चित करण्याबाबतची कार्यपध्दती</u>

महामंडळाच्या निर्णय प्रक्रियेत संचालक मंडळ हा सर्वोच्च घटक असून संचालक मंडळाकडून उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांस प्रशासकीय व आर्थिक अधिकार वेळोवेळी सोपविले जातात.

महामंडळाकडे सोपविण्यात आलेले विविध उपक्रम व प्रकल्प पार पाडण्याकरिता खाली दर्शविल्याप्रमाणे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांच्या हाताखाली अधिका-यांची नेमणूक करण्यात आली असून हे अधिकारी त्यांस नेमून देण्यात आलेल्या विषयावर पुढील कार्यवाही करणे/निर्णय घेणे इ. प्रक्रिया त्यांच्या स्तरावर करतात.

मूलभूत स्वरुपाच्या अथवा धोरणात्मक प्रकरणामध्ये अथवा आर्थिक प्रकरणी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांस अधिकार प्रदान करण्यात आलेले नसल्यास निर्णय संचालक मंडळाकडून घेतले जातात.




महामंडळाचा तांत्रिक विभाग प्रामुख्याने सह व्यवस्थापकीय संचालक (१) यांच्या अधिपत्याखाली काम करतो. महामंडळाकडून पार पाडण्यांत येणा-या प्रकल्पांवर कार्यकारी अभियंता यांची देखरेख असते. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे त्यांस उपअभियंता/कनिष्ठ अभियंता हे सहाय्य करतात. कार्यकारी अभियंत्यावर पर्यवेक्षक अधिकारी म्हणून अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता आहेत.

महामंडळातील प्रमुख अधिकारी त्यांची पदनामे, दूरध्वनी क्रमांक तसेच महामंडळाची मुंबई आणि राज्यात असलेली कार्यालये यांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक इत्यादि माहिती खालीलप्रमाणे :-